Review Of Research
ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# सावरकर आणि त्यांची हिंदू महासभा

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना

भारतीय हिन्दु तरूण मन या इस्लामिक परंपरेचा आणि भारतीय मुस्लीम मनाचा चिकीत्सकपणे विचार करत होते. स्वा. सावरकरांचा हिन्दुत्ववाद हा वस्तुत: मुस्लीम मानसिकतेचा विरोध व्यक्त करणारा प्रतिक्रियात्मक अविष्कार होता असे म्हंटल्यास अयोग्य होणार नाही. १९८० नंतर भारतात जी नव हिन्दुत्ववादी विचारसरणी अभिव्यक्त झाली. तीची बिजे स्वा. सावरकर आणि पुज्य माधवराव गोळवलकर यांच्या हिन्दुत्ववादी तत्वज्ञानात आढळतात. हिन्दु समाज एक संघटना म्हणुन कसा उभा राहु शकेल हा प्रश्न सावरकर आणि तत्कालिन हिंन्दु विचावंतांसमोर होता. हाच प्रश्न डॉ. आंबेडकरांसमोर होता.

हिन्दुत्ववादी विचार परंपरा इस्लामिक विचारपरंपरेपेक्षा पुर्णत: वेगळी, स्वतंत्र आहे. हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी इस्लामिक अक्रमणवादाची, इस्लामीक संस्कृतीची ऐतिहासीक चिकीत्सा केली आहे. १९२७ ते १९२९ या काळात आंबेडकरांनी बहीष्कृत



भारत हे पत्र चालविलेले होते. अस्पृश्योन्नतीच्या काळातही डॉ.आंबेडकरांचे मुस्लीम प्रश्नाकडे लक्ष होते. हिन्दु आणि मुसलमान या दोन संस्कृती आहेत. दोन वेगळी राष्ट्रे आहेत हा सिध्दांत त्यांनी "पाकिस्तान ऑर दि पार्टीशन ऑफ इंडिया (१९४०) या ग्रंथात माडला. "

मुसलमानाच्या राजकीय वर्तनाचे रहस्य उलगडुन दाखविण्यासाठी आंबेडकर त्यांच्या मनोरचनेचे विश्लेषण करतात. ही मनोरचना प्रामुख्याने इस्लाममधुन निर्माण झालेली आहे.

"इस्लामची धर्माज्ञा हे अंतिम सत्य आहे. अशी मुसलमानांची धारणा आहे. आपण इस्लामचे अनुयायी असल्यामुळे पुर्णत्वाला पोंहोचलो आहोत, आता आपणात सुधारणा व्हायला जागा नाही असे त्यांना वाटत असते. शिवाय हा धर्म सर्व जगालाच कोणत्याही देश, काळ, परिस्थितीत कल्याणकारक आहे अशी त्यांची श्रध्दा आहे. "

इस्लामधर्म जगाची विभागणी दार-उल-इस्लाम आणि दार-उल-हरब असे करतो. ज्या देशांत मुसलामान राज्यकर्ते नाहीत तो शत्रुदेश अशा देशात राहणाऱ्या मुसलमानांपुढे दोन पर्याय धर्माने ठेवलेले आहेत. एक तो देश सोडुन जाणे (हिजरत) खिलाफत चळवळीच्या काळात इंग्रजांच्या अधिपत्याखालील हिन्दुस्तान ही शत्रुभुमी आहे असे समजुन अनेक मुसलमान अफगाणिस्तानला निघुन गेले. दुसरा पर्याय धर्मयुध्द किंवा जिहाद. या धर्माज्ञेचा अर्थ असा की, प्रत्येक मुसलमान राज्यकर्त्याने आपल्या धर्माचा प्रसार करून शक्य तेवढे जग इस्लाममय केले पाहिजे.

डॉ. आंबेडकरांनी मुस्लीम धर्मश्रध्दांचा भारताच्या राष्ट्रवादाशी असलेला संबंध नेमकेपणाने व्यक्त केलेला आहे. -ते म्हणतात

"इस्लामला प्रादेशीक निष्ठा मान्य नाहीत. मुसलामानांची निष्ठा जागतिक मुस्लीम समाजावर आहे. पान इस्लामीझमला हाच आधार आहे. ह्याचाच अर्थ असा की, मुसलमान कोणत्याही प्रादेशीक राष्ट्राचा अभिमान धरू शकत नाही. म्हणुनच प्रत्येक भारतीय मुसलमानआपण प्रथम मुसलमान आणि नंतर भारतीय आहोत असे म्हणतो. त्याच्या निष्ठा देशबाह्य असतात. आणि देशाबाहेरच्या मुसलमनाचे सहाय्य घेऊन भारतावर वर्चस्व स्थापन करण्याची त्याची तयारी असते."

धर्मनिष्ठ मुसलमान राष्ट्रीय असू शकत नाही असा आंबेडकरांच्या विवेचनाचा आशय आहे. या प्रवृत्तीचा दुसरा अविष्कार म्हणजे देशाचा कायदा न मानणे. या संदर्भात डॉ. आंबेडकर

म्हणतात- "ज्या देशात मुस्लिम राज्य नाही तेथे इस्लामचा कायदा आणि देशाचा कायदा यात संघर्ष उत्पन्न झाला तर इस्लामचा कायदाच वरचढ झाला पाहिजे. देशाचा कायदा झुगारुन इस्लामचा कायदा मानने मुस्लीम समर्थनीय मानतात."

डॉ. आंबेडकरांनी काढलेला निष्कर्ष असा की- हिंन्दु आणि मुसलमान कधीही एकरुप होणार नाहीत ते कधीही एका राष्ट्राचे घटक होणार नाहीत. त्यांच्या धर्मश्रद्धा वेगळ्या आहेत, सामाजिक दृष्टीकोन वेगळे आहेत आणि मुख्य म्हणजे त्यांची अंतीम साध्ये व भवितव्यता वेगवेगळ्या आहेत ते दोन वेगवेगळे जैविक (स्पेसीज) प्रकार आहेत. त्यांच्या ऐतिहासिक संबधाच्या संदर्भात ते म्हणतात "एकमेकापुढे उभी टाकलेली दोन शस्त्रसज्ज सैन्ये आहेत".

डॉ. आंबेडकरासारखा प्रकांड पंडीत पुढे मुस्लीम मानसिकतेच्या संदर्भात वरील स्वरुपाचे विचार व्यक्त करतो ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे. भारतीय समाजाच्या मानसिकतेचे विश्लेषण आगामी काळातील हिन्दुत्वाच्या वाढीस कारणीभूत ठरलेल्या घटकाचे स्पष्टीकरणास उपयुक्त आहे. स्वा. सावरकरांनी स्वतंत्रपणे "हिंदुत्व" हा प्रबंध प्रकाशीत करुन हिंदुत्वा संबधीचा आपला विचार स्पष्ट केलेला होता. डॉ. आंबेडकर आणि, स्वा. सावरकर या दोघांही विचारवंताच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा कालखंड सारखाच आणि एकच डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या अस्पृश्य समाज वर्णव्यवस्थेच्या शेवटच्या पायरीवर पददलितांचे कलंकीत जीवन जगणारा आणि सामाजिक न्याय हक्कापासून पुर्णता वंचीत असणारा. डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेली सामाजिक न्यायाची चळवळ आणि त्याच काळातील स्वा. सावरकरांची हिन्दुराष्ट्रवादाला व्यापक वैचारिक बैठक देण्याची आणि हिन्दु समाजामधील अंधश्रृद्धा, रुढी, परंपरांना छेद देऊन हिन्दु समाजामधील सर्व जाती घटकांना समानतेच्या सुत्रात एकत्रित बांधण्याची चळवळ लक्षात घेण्यासारख्या घटना आहेत. डॉ. आंबेडकरांनी मुस्लीम मानसिकतेच्या संदर्भात व्यक्त केलेले परखड व स्पष्ट विचार सावरकारांच्या मुस्लीम समाजासंबधी मांडलेले विचारसरणीत साधर्म्य पावतात.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजामधील अस्पृश्य, पददलीत समाजाचा प्रश्न सामाजिक आणि राजकीय व्यासपीठावर मांडून, दलीताच्या अस्मीतेला आणि त्यांच्या अस्त्विाला भारताच्या राजकीय स्वांतत्र्याच्या संदर्भात एक निश्चित स्थान मिळवून दिले. त्यांना खरा राष्ट्रवादी, देशभक्त म्हणावे लागेल. भारतीय स्वातंत्र्य अंदोलनात मुस्लीम राजकीय नेतृत्वाने जशी स्वतंत्र व अलगतावादी भूमिका स्विकारुन पाकिस्तानची निर्मिती केली तशा स्वरुपाचे राजकारण डॉ. आंबेडकर करु शकले असते परंतु बाबासाहेबांनी देशाच्या स्वांतत्र्याला आणि देशाच्या ऐक्याला प्रथम स्थान दिले हे ऐतिहासिक सत्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निश्चितच दलीताचे राजकारण केले. दलीतांना आणि सर्वच मागसवर्गीयांना स्वतंत्र अस्मिता मिळवून दिली परंतू देशाच्या आणि राष्ट्राच्या ऐक्यास बाधा येणारे राजकारण केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय राजकारणावर विशेषतः १९८० नंतर आक्रमक हिंदुत्ववादी राजकारणाचा प्रभाव जाणवतो. भारतीय सामाजिक मन कांही प्रमाणात हिंदुत्वादी राजकारणाच्या प्रभावाखाली आल्याचे दिसते. स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वीच्या राजकारणाचा प्रवाह अभ्यासत असताना आपणास मुस्लीम लीगचे राजकारण आणि सावरकर प्रणीत हिंदु महासभेचे राजकारण दुर्लक्षीत करता येणार नाही. आजच्या परिस्थितीत मुस्लीम समाजाचा जाणवणारा अलगतवाद आणि त्या मागील असलेली परंपरा व विचार परंपरा जशा अखंडपणे वाहात आहेत आणि जागतिक पातळीवर इस्लामिक दहशतवाद फोफावत आहे तो लक्षात घेता इतर धर्मियाच्या मध्ये निर्माण झालेल्या प्रतिक्रियात्मक जाणीवा, धार्मिक संघटन प्रतिक्रियात्मक स्वरुपांत व्यक्त होत आहेत हे दिसते.

१९८० नंतर भारतात उदयास आलेल्या हिंदुत्वादी विचाराची बैठक स्वा. सावरकर प्रणीत "हिंदु राष्ट्रवाद व राष्ट्रीय स्वयं संघ" प्रणीत हिंदुत्ववादी तत्वज्ञानावर आधारीत आहे असे विधान केल्यास तर्क विसंगत ठरणार नाही. नेमकेपणे सावरकरांना अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद कोणता? त्याचे नेमके स्वरुप कसे आहे ? हे पाहाणे असंयुक्तीक ठरणार नाही.

स्वातंत्र्यपुर्व काळात भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य अंदोलनाला एकात्म स्वरूप देण्याचा प्रयत्न राष्ट्रीय नेते करीत होते. परंतु राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासुनच सर सय्यद अहमदखान यांनी आपली इस्लामिक अलगतावादी भुमिका स्पष्ट केलेली होती. भारतात हिन्दु आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे असुन त्यांचे राजकीय सह आस्तित्व अशक्य आहे असी राजकीय विचारसरणी मुस्लीम लिगच्या नेत्यांनी मांडलेली होती. मुस्लीम लिगचे राजकारण आणि त्यांची विचार परंपरा लक्षात घेऊनच स्वा. सावरकरांनी हिंदुंचे संघटन हा मुलगामी हेतू विचारात घेऊन आपला व्यापक हिन्दुत्व वाद मांडला. मुस्लीम आक्रमकवाद आणि आलगतावादाला हिन्दु संघटन हेच उत्तर आहे असे सावरकर म्हणतात. सावरकर केवळ हिंदु संघटनावरच न थांबता हिन्दुराष्ट्र ही भुमिका मांडतात. कोणत्याही लोकसमुहाचे संघटन होण्यासाठी आपण सारे एक आहोत, आपले हितसंबंध एक आहेत. अशी भावना वृध्दींगत व्हावी लागते. सावरकरांचा हिन्दुराष्ट्रवाद हिन्दु संघटनवादाच्या

पायावर उभा राहतो. सावरकर हिन्दु राष्ट्रवादाचे उद्‌गाते म्हणुन ओळखले जातात. त्यांनी एक नवा राष्ट्रवाद मांडला. राष्ट्रवादाची जुनी कल्पना बाजुला सारली. हे त्यांचे वैचारीक क्षेत्रातले योगदान दुर्लक्षीत करता येणार नाही.

सावरकरांनी हिंदुत्वाला बहुमुखी आशय प्राप्त करून दिला. हिंदु ही संकल्पना धार्मिक असण्यापेक्षा प्रादेशिक आणि सांस्कृतिक, आर्थिक आहे, या अर्थानेच आपण सारे हिंदु एक आहोत अशी भावना प्राचीन काळापासुन आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला. हिंदु हा एक सांस्कृतिक गट म्हणुन हिंदु शब्दाला आशय प्राप्त करून दिला.

### सावरकर आपल्या हिंदुत्व या ग्रंथात हिंदुची लक्षणे सांगतात-

१) सिंधु पासुन सिंधू (समुद्र) पर्यंत विस्तारलेल्या या देशाचा रहिवासी.
२) सर्व हिंदुमध्ये समान रक्त आहे, आपण सारे हिंदु एका वंशाचे आहोत.
३) हिंदुंची एक विशिष्ट संस्कृती आहे.

सावरकरांच्या एकुण विचारांत व विवेचनात संस्कृती हा हिंदुत्वाचा निर्णायक घटक मानलेला आहे.

आसिंधु सिंधुपर्यंताः यस्य भारतः भूमिका /
पितृभूः पुण्यभूरचैव स वै हिन्दुरिती स्मृतः //

सावरकर भारत भूमिला मातृभू, पितृभू व पुण्यभू असे म्हणतात. सावरकर पुण्यभूचा सविस्तर अर्थ सांगुन भारत केवळ पवित्र भुमि नव्हे तर धर्मभुमि, जेथे धर्मग्रंथ व धर्माचे उद्‌गाते जन्मले, जेथे आमची पवित्र धर्मक्षेत्रे व स्थळे आहेत तोभूप्रदेश. भारतात असलेले केवळ सनातन धर्मीच हिंदु नसुन जैन, बौध्द, शिख,अदिवासी इ. अनेक वंशाचे, पंथांचे, संप्रदायाचे लोक हिंदु ठरतात असे म्हणतात.

सावरकरांनी हिंदुत्वाला व्यापक आशय दिला आणि हिंदुत्वाची कक्षा पण आधिक व्यापक केली. सावरकर हिंदुत्वाची व्याख्या मांडण्यापुर्वी जी हिंदुत्वाची व्याख्या मांडली जात असे. तीचा संबध मुख्यतः सनातन हिंदु धर्मातील, वैदिक स्मृती पुराणोक्त धर्माशी घातला जात असे. सावरकरांनी हिंदुत्व पुण्यभुवर अधिष्ठीत करून हिंदुत्वाचा सनातन धर्माशी असलेला संबंध तोडला. हिंदुस्थानात जरी अनेक धर्म निर्माण झाले असले तरी ते सर्व हिंदु झालेले आहेत असे त्यांचे विधान आहे. सावरकरांना अभिप्रेत असणाऱ्या सर्व हिंदुना एकत्रीत बांधणारे कोणतेही धार्मिक सुत्र नाही. ख्रिश्चन आणि मुसलमानांना एकत्रीत बांधाणारे धर्मसुत्र एक धर्मग्रंथ-एक प्रेषीत अशा स्वरूपाचे आहे. ते म्हणतात हिंदुधर्म असा शब्द वापरावयाचाच असेल तर तो हिंदुंच जे अनेक धर्म आहेत त्यांच्या समुच्चयाला वापरावा. आपली हिंदुत्वही संकल्पना धार्मिक नसुन ती राष्ट्रीय, वांशीक आणि सांस्कृतिक आहे असे ते म्हणतात.

### सावरकर आणि त्यांची हिंदू महासभा

भारतीय भूमीला ब्रिटीशाच्या साम्राजशाहीचा जोरतंडातून स्वतंत्र करु पाहणारा क्रांतीवीर, क्रांतीकारी चळवळीचा प्रेरणास्त्रोत आणि हिंदू समाजाचे संघटन करण्याच्या दुर्दम्य ध्येय प्राप्तीच्या सिद्धीसाठी बुध्दिवादी समाज सुधारणेचा वसा घेतलेला समाजसुधारक म्हणून स्वा. सावरकराचे नांव भारतीय इतिहासात कायमचे नोंदले गेलेले आहे. स्वा. सावरकरांना समजून घेण्यासाठी त्यांची जीवनात आणि राजकारणात स्विकारलेला बुद्धिवादी दृष्टीकोन आपणास समजून घ्यावा लागेल. राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीने जेव्हा जेव्हा भारत देश अडचणीत येईल, भारतीय हिदु समाज अंधश्रध्दा होउन सामाजिक विघटनाच्या विपरीत संकटाला सामोरे जाईल आणि जातीयतेच्या अर्हतेने ग्रासलेला होईल त्या त्या वेळेस राष्ट्रास व स्वा. सावरकाराचे स्मरण भारतीयांना होईल. स्वा. सावरकरांनी आयुष्यभर कोणतीही तडजोड न स्विकारता आपली राष्ट्रनिष्ठा जोपासली, वैयक्तीक जीवनात अनेक खडतर प्रसंगाला सामोरे जाऊन सामाजिक अवहेलना स्किारून स्वजनाच्या विरोधाला न जुमानता आयुष्याच्या उत्तर काळखंडात विजनवास स्विकारून देखील त्यांनी आपला जीवननिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा बदलल्या नाहीत. हिमालया सारखे उत्तुंग व्यक्तीमत्व आणि तीतकीच बुध्दीमत्ता लाभलेले सावरकर बुध्दीवादी दष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. दुर्दैवाने सावकराना खऱ्या अर्थाने सश्रध्द हिन्दुमनाने समजून घेतले नाही. सावरकरांना सर्वच क्षेत्रातील बुध्दिवादी दृष्टीकोन प्रस्थापित हिन्दुवादयांना लाभार्थी आणि त्यांचे हितसंबंध सुरक्षीत ठेवणारा नव्हता म्हणून सावरकराच्या विचारा भोवती तथाकथित हिन्दुवाद्यांनीच दाट धुक्याचे वलय निर्माण करुन त्यांच्या व्यक्तीमत्वाभोवती संशयाचे जाळे निर्माण केले आहे, म्हणून सावरकर आणि त्यांची हिन्दुमहासभा समजून घेताना आपणास बुद्धिवादी चिकित्सक दृष्टीकोन अंगीकरण अपरिहार्य आहे. सावरकराचा अभ्यास करताना, सावरकर एक व्यक्ती, एक राजकीय नेता,

धर्म चिकित्सक, समाजसुधारक अशा विविध दृष्टीकोनातून समजून घेऊन त्यांची मांडलेला हिन्दू राष्ट्रवाद चिकित्सकपणे मांडावा लागतो.

स्वा. सावरकरांना अभिप्रेत असलेला हिंदुत्वावाद व हिंदू राष्ट्रवाद वस्तुतः या देशाला सामर्थ्य संपन्न करु पाहाणारा भारतीय समाजाला पारंपारिक व गतानुगतिक जीवन पद्धतीच्या बंधनातून मुक्त करुन विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन देऊ पाहाणारा अशा स्वरुपाचा होता. त्या दृष्टीने व हेतूनेच त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. स्वा. सावरकर आणि त्यांची हिंदू महासभा त्यांचे राजकीय व सामाजिक चिंतन समजून घेण्यासाठी त्यांच्या तत्वज्ञानावर कोणत्या विचार परंपरेचा प्रभाव पडलेला होता हे समजून घेणे उपयुक्त ठरेल. सावरकरांची पाश्चात्य विचारवंत नित्से आणि त्यांचे तत्वज्ञान वर निष्ठा होती. "सामर्थ्य हाच सर्वश्रेष्ठ सदगुण असून ते मिळविणे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे. निसर्ग हा सुष्ठ किंवा दृष्ट यांच्या पलीकडे असतो. माणसे निसर्गात असमान असतात. नैतिकता दुर्बलांनी शोधलेले हत्यार असून ते प्रबळ लोकांचे धैर्य खचवणे व त्यांच्यावर मर्यादा घालणे यासाठी वापरले जाते" नित्र्येच्या विचाराचा गाभा लक्षात घेतल्यास आणि सावरकरांनी आत्मसात केलेला नित्सेवाद विचारांत घेतल्यास सावरकरांचा एक विचाराची बैठक आणि दिशा आपणास समजू शकेल. सावरकरांना अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद आणि सामर्थ्यशाली शस्त्रसज्ज व अत्मसज्ज हिंन्दु राष्ट्र नित्से तत्वज्ञानाची सुसंगत असल्याचे जाणवते. सामर्थ्यशाली राष्ट्र बांधणीसाठी त्यांनी स्विकारलेला व्यवहारवाद आपणास दुर्लक्षीत करता येणार नाही.

म्हणनूच गांधी तत्वज्ञान, त्यांची अंहिसा, त्यांचा मुस्लीमाप्रती असणारा भूतदयावादी व मानवता दृष्टीकोन सावरकरांच्या टिकेचे दक्ष ठरले. सशस्त्र क्रांती हे स्वातंत्र प्राप्तीचे एकमेव साधन असून सशस्त्र क्रांतीविना स्वातंत्र्य प्राप्ती अशक्य असे त्याचे मत होते.

इ.स. १९२४ पुर्वीचे सावरकर क्रांतीकारी सावरकर होते. स्वातंत्र्यासाठी काय करायचे, कोणत्या मार्गाने जायचे ते मार्गनिवडीचे स्वातंत्र्य त्यांना होते. क्रांतीचा मार्ग स्विकारलेल्या व्यक्तीने स्विकारलेला मार्ग त्याचा स्वताचा असतो. १९२४ नंतर मात्र सावरकर पुर्णतः बदलेले दिसतात. रत्नागीरीतील स्थानबद्दतेत सावरकर एक अग्रगण्य समाजसुधारकाच्या भुमिकेत साकार झालेले दिसतात. आपल्या राजकाणाला सामाजिक सुधारणेचा पाया घालणारे सावरकर अविश्रांत श्रम करणारे सावरकर होते. १९२४ पर्यंत भारतीय राजकारणाचे स्वरुप जनमतात व्यापक पायावर विकसीत होत चाललेले होते. सशस्त्र क्रांती घडवून आणू पाहणारे सावरकर आणि आपल्या मनाप्रमाणे इतिहास घडवून आणू पाहाणाऱ्या सावरकरांना दिर्घकाळापर्यंत तुरुगांत कितपत पडावे लागले होते.

"राजकारणांत सावरकरांनी टिळकांना आणि चिपळूणकरांना गुरु मानलेले होते. हुतात्मा दामोदर चाफेकर हे त्यांचे प्रेरणास्थान होते. सावरकरांनी रत्नागिरीत ज्या समाज सुधारणा केल्या, त्या करीत असताना सावरकरांनी वेदांता संबंधी घेतलेली भूमिका अभूतपुर्व आहे. ही भूमिका घेताना सावरकर आपल्या प्रेरणास्थानाच्या भूमिकेपासून आणि गुरुच्या वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकारापासून कसे दूर जात होते हे समजून घेणे म्हणजे त्या व्यक्तीमत्वाचा विकास व्यापकतेकडे कसा होत होता हे समजून घेणे होय"

(रावसाहेब कसबे- हिंन्दू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदूत्ववाद पृ २१०)

"महापुरुषांना समजावून घेण्यासाठी ऐतिहासिक समाजशक्ती समजून घ्याव्या लागतात. इतिहासातील सामाजिक प्रक्रीया शोधाची लागते-की ज्या प्रक्रियेत व्यक्ती एक सामाजिक प्राणी असतो. स्वा. सावरकरांना १९२४ साली सुद्धा त्यांच्या मनातील आदर्श समाज सेवेचे चित्र रेखाटता आले नाही. कारण त्या काळखंडातील त्यांचे अस्तित्व ज्या इतिहास दत वारसानी बांधलेले होते ती बंधने या मार्गातील सर्वात मोठी अडचण होती.-

## सावरकरांचा जीवनदृष्टीकोन

सावरकरांचा जीवन दृष्टीकोन हा पुर्णतः बुध्दीवादी व विज्ञाननिष्ठ होता. सावरकरांच्या विज्ञान निष्ठेला रोखठोक व्यवहाराचा, उपयुक्ततावादाचा आधार होता. मानवप्राण्याकडे देखील सावरकर याच दृष्टीने बघत असत. सावरकरांची मानवी संबंधाबाबतची एक जीवनदृष्टी होती. तीला बुध्दीवादाचा आणि उपयुक्ततावादाचा आधार होता. त्या दृष्टीला डार्विनच्या उत्क्रांतीवादाचे जबरदस्त आकर्षण होते. सावरकरांचा राजकीय प्रवास, त्याचे इतिहास लेखन धर्मासंबंधीची त्यांची चिकीत्सा व अर्थ समजुन घेण्यासाठी त्याचा जीवन दृष्टीकोन उपयुक्त ठरू शकतो.

स्वा. सावरकरांच्या इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांनी हर्बर्ट स्पेन्सर, बेथॉम आणि जॉन स्टुअर्ट मीलचा चिकीत्सक अभ्यास केला. बेथॅम आदींनी मांडलेला उपयुक्ततावादाच्या Utiletarian Theory सिध्दांताचा त्यांच्या विचारावर सखोल परिणाम करणारा विचार ठरला. म्हणुनच मानवी नाते संबंधाबाबत देखील त्यांचा दृष्टीकोन भावनात्मक नव्हता, तो उपयुक्ततावादाशी निगडीत होता. हिंदूंची गायी संबंधीची भावना गाय देवताचे वसती स्थान आहे. त्यांना मान्य नव्हते. गाय हा एक उपयुक्त पशु असून प्रसंगानुसार गोहत्या त्यांनी मान्य केली.

स्वा. सावरकरांना अभिप्रेत असणारा नितीमुल्या संबंधीचा विचार हा उपयुक्ततावादी सिध्दांतावर आधारीत होता. मानवी जीवनांत चांगले काय आणि वाईट काय, धर्म अधर्म, नैतिक आणि अनैतिक ज्या कसोट्यांच्या आधारे ठरविले जाते, त्यालाच नितीमुल्ये असे म्हंटले जाते. सावरकरांच्या नितीमुल्यांचा पाया बुध्दीवाद होता. आपल्या आत्मचरित्रांत ते म्हणतात च्ज्या नितीशास्त्राच्या पायावर आणि सुत्राधारे आपल्या क्रांतीकारक अंदोलनास आपला उभारले पाहिजे ते Utility उपयुक्तता हेच नितीशास्त्र हीच क्रांतीची मनुस्मृती असे मी म्हणे असे मी मानी. (-२०६) (स्वा. स्वावरकर वाङःमय खंड १ पृष्ठ २०६)

उपयुक्ततेच्या सिध्दांताचा आधार बुध्दी हाच होता. बेथॅम, जॉन स्टुअर्ट मिल इ. नी मांडला. उपयुक्ततावाद बुध्दीवादावरच आधारलेला होता. सावरकरांना महाभारतातही नितीशास्त्र बुध्दीवादावर आधारीत असलेला आहे असे वाटे. महाभारतातील श्रीकृष्टणाच्या अनेक प्रसंगीच्या भाषणावरून आणि व्यवहारावरून मी सिध्द करी की उपयुक्ततावादाचा पहिला प्रणेता श्रीकृष्ण हाच आहे, नव्हे आचार्य कारण त्यांनी तो करून दाखविला. (१.२०३ स्वा.सा.वाङःमय)

उपयुक्ततावाद हा मानवी हितावर आधारलेला होता. पाश्चात्य विचारवंतांनी ज्या सुत्रबध्द पध्दतीने उुपयुक्ततावादाची चिकीत्सा केली तशी सावरकरांनी केली नाही. त्याचा नितीसंबंधीचा दृष्टीकोन त्यांची जीवन विषयक दृष्टी स्पष्ट करते.

मानवी जीवनातील जे जे विचार नी आचार उपयुक्त ठरतील त्या त्या सर्वांना निती किंवा सद्गुण म्हणावे आणि त्यांच्या विरोधी जे जे असे त्यांना अनिती किंवा दुर्गण म्हणावे हाच न्याय सर्व नितीशास्त्राने त्यांनी मान्य केलेला आहे. याचाच अर्थ नितीची कल्पना मानवी जीवनावर मुख्यतः आधारीत आहे.(३.६ स.सा. वाङःमय)

सावरकरांचा राजकीय जीवन प्रवास आणि त्यांनी अंगीकारलेली राजकीय मुल्ये ही मुख्यतः भारत हे समर्थ, सामर्थशाली, शस्त्रसंपन्न राष्ट्र म्हणुन कसे उभे करता येईल या उद्दिष्टाने मांडलेली होती हे स्पष्ट दिसते. त्या दृष्टीने त्यांनी हिंद महासभेत पुरविलेली राजकीय विचारांची बैठक निश्चितच विचारांत घेण्यासारखी आहे. त्यांच्या राजकारणाकडे आणि धर्मकारणाकडे बघण्याचा दृष्टीकोन पुर्णतः व्यवहारवादी असल्या कारणाने त्यांनी मांडलेले विचार अगदीच रोखठोक आणि सडेतोड वाटतात. त्यांनी केलेली म. गांधीच्या अंहिसेची संभावना आणि टिका त्यांच्या विचारांचे स्वरुप स्पष्ट करतात. वस्तुतः गांधीच्या विचारांची बैठक आणि त्यांचे राजकारण वेगळया सिद्धांतावर (अहिंसेच्या) आधारीत असल्या कारणाने गांधीच्या राजकारणाचे स्वरुप पुर्णतः सावरकरी राजकारणापेक्षा भिन्न असणे स्वाभाविक आहे. कोणत्याही महापुरुषांच्या कर्तत्वाचे मुल्यमापन वस्तुतः तत्कालीन विविध परिस्थितीच्या संदर्भात करावे लागत असते.

सावरकरांची स्थानबद्धतेतून मुक्तता होईपर्यंत म्हणजेच १९३७ पर्यंत देशाचे राजकारण व राजकारणाचे स्वरुप बदललेले होते. १९३७ पर्यंत देशाच्या राजकारणाची प्रक्रिया ही वैद्यतेच्या मान्यतेच्या संकल्पनेपर्यंत विकसीत झालेली होती. सशस्त्र क्रांती, सशस्त्र राजकीय उठाव हा विचार मागे पडून स्वांत्र्याच्या विचार जनमानसात रुजवून, जनतेच्या सार्वभैमत्वाची लोकशाहीला आधारभूत असणारा विचार प्रत्यक्षात कार्यवाहीत करणे, राजकीय प्रशिक्षण व राजकीय संस्कृती विकसीत करण्याची आवश्यकता निर्माण झालेली होती. याची जाण सावरकरांना आलेली होती. म्हणून ते आपल्या अनुयायावर माझे समुद्र उडी आता विसरा आणि जनतेस नविन विचाराची प्रेरणा करा असा संदेश देत होते. सावरकरांचा अनुयायी वर्ग यादृष्टीने सावरकरांच्या कार्यात कुठेतरी कमी पडत होता हे जाणवते. त्यांच्या विचार सामान्य माणासपर्यंत पोहण्याच्या दृष्टीने ज्या चळवळी आणि जनअंदोलन उभे राहणे आवश्यक होते ती अंदोलने उभी राहू शकली नाही. ही एक वस्तुस्थिती आहे. तरीपण भारतीय राजकारणावर प्रभाव निर्माण करु शकणारी हिंदुत्ववाद्यांची एक फळी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसते. त्या दृष्टीने हि.म.स. आणि तीचे राजकारण समजून घेणे अपरिहार्य ठरते.

## निष्कर्ष आणि समारोप

स्वातंत्र्य चळवळीतील मुस्लीम लीगचे आणि मुस्लीम नेतृत्वाचे योगदान काय? वस्तुतः मुस्लीम लीगचे स्वातंत्र्यपुर्व काळातील राजकारण दबावगटाचे राजकारण आहे. कॉग्रेस नेतृत्वाने आणि इतराची स्वातंत्र्यासाठी कारागृहाच्या आणि इतर स्वरूपाच्या शिक्षा भोगल्या. चळवळी, आंदोलने, सत्याग्रह हे सर्व स्तरावर काँग्रेसने घडवून आणली. आणि दबावगटाचे राजकारण करून धर्माच्या आधारे लीगने पाकिस्तान मिळविले ही वस्तुस्थिती आहे. याचा हिंदूत्ववाद्याना राग आहे. अखंड भारताच्या नावे संघ आजही घोषणा देताना दिसतो. पण या निमीत्ताने काही प्रश्न - उपप्रश्न निर्माण होतात, हे संघ सोयीस्करपणे विसरतो. अखंड भारत निर्माण होणे त्या काळी शक्य होते का? जर ती शक्यता होती तर फाळणीच्या विरोधात संघाने आपली शक्ती उभी केली काय? फाळणीच्या निमीत्ताने संघाला एक मोठे वरदान मिळाले आहे. या निमित्ताने हिंदूच्या मनांत मुस्लीमाविषयी व्देष निर्माण करणे संघाला शक्य झालेले आहे. फाळणीच्या विरोधात सावरकरानी एकाकी लढत दिली जीला इतिहासांत तोड नाही.

सावरकरानी पाकिस्तानला पापस्तान असे म्हटले. भारत भूमीची फाळणी हा सावरकराच्या ह्रदयावर झालेला घणाघाती घाव होता. (क्रांतीघोष पृष्ठ १४०) सावरकराची मानवी वेदना त्यांच्या प्रत्येक शब्दामधून व्यक्त होत होती. ते म्हणतात, १९२७ साली मी रक्ताची शाई करून लिहीत होतो. ते वाचून पुण्याच्या टेकडयाला पाझर फुटला, पण तुम्हाला पाझर फुटला नाही. या कृत्यकर्माची पापे आपण सारेच भोगत आहोत. दुर्दैवाने मी खरा भविष्यवादी ठरलो. आता माझा आणि तुमचा संबंध काय उरला? आता माझा भारतासीही संबंध नाही. भारतातल्या प्रांतासी, नगरासी व गावासीही नाही. भूमीच्या एका एकरासाठीही नाही. आता केवळ साडेतीन हात भूमीशीच संबंध राहील. की जे मात्र जाळायला किंवा पुरायला लागेल. फाळणीच्या विरोधातील ही तळमळ कोणत्याही संघवाल्यात नाही.

फाळणीच्या वेळची संघाची भूमिका कशी होती त्या संबंधी धंनजय कीर यांनी चांगला प्रकाश टाकलेला आहे. पाकिस्तानच्या निर्मीतीला सावरकरांनी केलेला प्रखर विरोधाच्या प्रकरणांत एका महत्वाचा मुददा सांगितला पाहिजे. भारताचे विच्छेदन घडून येवू नये यासाठी सावरकरांच्या नेतृत्वाखाली केवळ एकटया हिंदू महासभेनेच काय ते जीवापाड कसोशीने प्रयत्न केले. काँग्रेसने भारताच्या फाळणीचा ठराव मंजुर केला तेव्हा काँग्रेस महासमितीतील समाजवादी गटाने या जीवन मरणाच्या प्रश्नावर अक्षम्य आणि घृणास्पद मौन धारण केले. आपल्या मातृभूमीची कापाकाप होत असताना आर्य समाज डोळे उघडे ठेवून थंड बसला. रा. स्व. संघाने निष्क्रिय प्रेक्षकाची भूमिका घेतली होती. मातृभूमीच्या चिरफाडी विरूध्द साधी शांततामय निदर्शने करण्याच्या कामीदेखील रा. स्व. संघीयानी हिंदू महासभेला अधिकृत वा व्यक्तीशः सहकार्य करण्यास पुर्ण नकार दिला होता. **हे मातृभूमी तुजला मन वाहियेले** अशा आशयाची सर्व समर्पणाची आरती जे रा. स्व. संघीय सकाळ, दुपार, संध्याकाळ घसा खरवडून गात राहिले जे प्रत्यक्षांत मात्र आपल्या देशांत कुठे काही झालेच नाही अशा थारांत निर्लेप मनाने संघ स्थानकावरच्या **दक्ष नि आराम** कवायतीमध्ये दक्षतेने आराम करण्यात रममाण झाले होते. काही दिवसानी रा. स्व. संघीयानी तुरूंगवास भोगला, पण कशासाठी? आपल्या मातृभूमीच्या विच्छेदनाला विरोध करण्यासाठी नव्हे, तर आपल्या संघटनेवर घातलेल्या बंदी विरूध्द निषेध व्यक्त करण्यासाठी. (कीर ४०४).

स्वातंञ्यवीर सावरकराचे राजकारण कसेही असो, सामान्य जनतेने त्यांना स्विकारले नसेल परंतु त्यांची राष्ट्रावरील निष्ठा अविचल होती. स्वा. सावरकर खास आपल्या ढंगाने जगले. त्यांनी कधीच कोणाची पर्वा केली नाही. आपल्या मनाप्रमाणे त्यांना जे करावयाचे होते ते त्यांनी केले. त्यांनी इतर कोणाचीही जबाबदारी स्वीकारली नाही आणि कोणालाही जबाबदार धरले नाही. एका अर्थाने ते प्रवाहाच्या विरूध्द दिशेने पोहत राहिले. दमछाक झाली तरी ते डगमगले नाहीत. जनतेने अव्हेरले तरी त्यांना खंत वाटली नाही. ते सतत स्वतःसी आणि विचारांसी प्रामाणिक राहिले. (हिंदू - मुस्लीम प्रश्न व सावरकराचा हिंदुत्ववाद रावसाहेब कसबे, पृष्ठ ४८७). हिंदूत्ववादी राजकारणाबाबत असलेली सावरकरांची भूमिका व गोळवळकरांची भूमिका वरील चर्चेत स्पष्ट झालेली आहे. हिंदुत्ववादी राजकारण हे भारतात सर्वव्यापी झालेले असुन घटक राज्याचे राजकारणदेखील त्यापासून अलिप्त राहिलेले नाही. याचा आढावा ५ व्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. धर्म, समाज, राजकीय व्यवहार यांचा परस्पर संबंध असून राजकारणात धर्माचा अवलंब केल्याने सामाजिक जीवन ऐक्याला तडे जाण्याचा संभाव्य धोका निर्माण होतो. भारतीय समाजाचे समिश्र वास्तव रूप हिंदूत्ववादी राजकारणामुळे अधिक विरूप झालेले आहे. त्याचा आढावा सहाव्या प्रकरणात घेण्यात आलेला असून हिंदू राष्ट्रवाद भारतीय सामाजिक ऐक्यास कसा भेडसावत आहे, याची सविस्तर चर्चा केलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ


१ साधना सप्टेंबर ०५ — पृ. ०९.

२ आंबेडकराच्या हिंदूकरणाची चिकित्सा, बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, — सुहास पळशीकर

३ सावरकराचं समाजकारण (प्रा. शेषराव मोरे) सत्य आणि विपर्यास — पृ. १३०

४ समकालीन भारतीय राजकारण, ले. सुहास पळशीकर, — पृ. २२१ व २२२

५ प्राचीन भारतातील गुलामगिरी (लोकवाङमय १९७८), मुंबई, — देवराज चनाना

६ संघातले दिवस — स.ह. देशपांडे

७ पुरोहित वर्ग वर्चस्व आणि भारताचा सामाजिक इतिहास — डॉ. सुमंत मुरंजन

८ धर्मसंसंद अधिवेशन, विश्व हिंदू परिषद, नवी दिल्ली, च्या पुस्तिकेतील आचार संहितेच्या अनुषंगाने प्रा. रमेश पानसे यांची असे असेल हिंदु राष्ट्र पुस्तिका.

९ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ - लक्ष्य व कार्य - बाळासाहेब देवरस मोरया प्रकाशन, डोंबीवली.

१० म. ज्योतीबा फुले पंढरीनाथ पाटील.